वाचले : १) शासन अ.शा.पत्र क्रमांक आयआयएस-०६०९/प्र.क्र.१३९/राऊश-२ दि. २९.७.२००९

विषय : ग्रामरक्षक दल सदस्यांनी अवैध दारु बाबत केलेल्या तक्रारी संबंधी त्वरीत कारवाई करण्याबाबत.

## परिपत्रक

क्रमांक : एफएलआर/सीएलआर ११२००९/२०५८८/सात मुंबई २९ जुलै २००९

शासन आदेशानुसार ग्रामीण विभागात ग्रामरक्षक दल स्थापन करण्यात आलेले आहे. दारुबंदी व अवैध दारुचा प्रसार थांबविण्यासाठी सुध्दा ग्रामरक्षक दलाकडून योग्य ते कार्य करण्यात येत असते. अवैध दारुच्या धंदयाबाबत ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांनी काही तक्रारी केल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी त्याची त्वरीत नोंद घेऊन अवैध दारु धंदयात गुंतलेल्या व्यक्ती विरुध्द मुंबई दारुबंदी कायदा १९४९ मधील तरतूदीनुसार त्वरीत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही करण्यासंबंधीच्या सुचना आपल्या अधिपत्याखालील सर्व राज्य उत्पादन शुल्क अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात याव्यात. तसेच ग्रामरक्षक दलाने केलेल्या तक्रारीबाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी कार्यवाही न केल्याबाबत काही तक्रारी आल्यास तसेच अशा तक्रारीची दखल घेतली नाही असे आढळल्यास अशा अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कडक कारवाई करण्यात येईल असेही संबंधीत अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

२९.७

(अ.ब.घाटोळ)
सह आयुक्त ( प्रशासन )
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबईकरिता

प्रत

१) सर्व विभागीय उप आयुक्त राज्य उत्पादन शुल्क

२) सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क
अधीक्षकांनी संबंधीत निरीक्षक दुय्यम निरीक्षक व जवान यांच्या हि बाब निदर्शनास आणावी.

३) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.